ePaper

## “सर्किट ब्रेकर बदला!” बराक ओबामांचा डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जोरदार हल्ला




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 26 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 3 वरुन...

इंद्रायणीनगरमध्ये आरोग्य सुविधांना मिळणार बळ!

### २५ हजार कोटींची गुंतवणूक आणि एक लाख रोजगारांचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट

# नवी मुंबईत उभारणार जागतिक सुवर्णनगरी!

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्राला जागतिक रत्न व आभूषण उत्पादन आणि निर्यातीचे प्रमुख केंद्र बनविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. नवी मुंबईतील महापे येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या ‘इंडिया ज्वेलरी पार्क’च्या कोनशिलेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. सुमारे २२ एकर क्षेत्रावर विकसित होणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातून २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात एक लाख रोजगारांच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. २०२८ च्या अखेरीस प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरू करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.**




मुंबई आणि महाराष्ट्राला रत्न व आभूषण उद्योगाची समृद्ध परंपरा लाभली आहे. कुशल कारागीर, अनुभवी उद्योजक, व्यापारी जाळे आणि औद्योगिक पायाभूत सुविधा यांच्या बळावर राज्याला जागतिक बाजारपेठेत अधिक भक्कम स्थान मिळवून देण्याची क्षमता या प्रकल्पात आहे. इंडिया ज्वेलरी पार्कमुळे दागिने उत्पादन, संशोधन, रचना, कौशल्यविकास आणि निर्यातीला एकाच ठिकाणी चालना मिळणार आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

इंडिया ज्वेलरी पार्कची संकल्पना २०१७ मध्ये मांडण्यात आली होती. जमीन उपलब्धता, आवश्यक करार, सवलती आणि निविदा प्रक्रिया अशा विविध टप्प्यांतून हा प्रकल्प पुढे आला. मार्च २०१९ मध्ये भूमिपूजन झाल्यानंतर प्रत्यक्ष उभारणीला अपेक्षित गती मिळाली नव्हती. आता कोनशिलेचे अनावरण झाल्याने प्रकल्पाच्या कामाला वेग येण्याची अपेक्षा आहे. या ठिकाणी दोन हजारांहून अधिक उत्पादन युनिट्स उभारण्याचे नियोजन असून, उद्योगासाठी आधुनिक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

भारताच्या रत्न व आभूषण निर्यातीमध्ये महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. मुंबईतील झवेरी बाजार आणि भारत डायमंड बोर्स यांसारख्या केंद्रांमुळे राज्यात या उद्योगाचे व्यापक जाळे निर्माण झाले आहे. मात्र, जागतिक बाजारपेठेतील स्पर्धा, व्यापारातील बदल आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे उद्योगांसमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. त्यावर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण उत्पादन पद्धती आणि निर्यातीच्या नव्या संधींचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

राज्य सरकारने स्वतंत्र जेम्स अँड ज्वेलरी धोरण तयार केले असून, उद्योग प्रतिनिधींशी चर्चा करून त्याची आखणी करण्यात आली आहे. लॅब-ग्रोन डायमंड उद्योगाच्या विस्तारासाठीही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. उद्योगांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन सहकार्य करेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. प्रकल्पाच्या उभारणीदरम्यान वीज, पाणी, रस्ते, भांडवल आणि विविध विभागांच्या परवानग्या वेळेत मिळणे महत्त्वाचे असल्याने संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इंडिया ज्वेलरी पार्क हा केवळ उत्पादन प्रकल्प नसून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा महत्त्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले. राज्याच्या जेम्स अँड ज्वेलरी धोरणांतर्गत एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे, पाच लाख रोजगार निर्माण करणे आणि रत्न व आभूषण क्षेत्रातील निर्यात दुप्पट करणे अशी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. उद्योगातील गुंतवणुकीमुळे रोजगारनिर्मिती आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले.

प्रकल्पासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि परवानग्या उपलब्ध करून देण्याबरोबरच स्थानिक तरुणांना प्रशिक्षणाच्या संधी देण्यावरही शासन भर देणार आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी या प्रकल्पामुळे नवी मुंबईचे औद्योगिक महत्त्व वाढेल, असा विश्वास व्यक्त केला. माहिती तंत्रज्ञान आणि डेटा सेंटर क्षेत्रासोबतच जागतिक रत्न व आभूषण उद्योगातही नवी मुंबईची ओळख अधिक ठळक होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

रत्न व आभूषण निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष किरीट भन्साळी यांनी प्रकल्पासाठी राज्य सरकारने केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. पार्कमध्ये आधुनिक उत्पादन युनिट्स, रिफायनरी, कार्यालयीन इमारती, खाद्यपदार्थ केंद्र आणि पूरक सेवा विकसित करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. वीजदर सवलती, व्याज अनुदान आणि अन्य प्रोत्साहनपर सुविधांमुळे उद्योगांना मदत होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी आमदार संदीप नाईक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह, रत्न व आभूषण निर्यात प्रोत्साहन परिषदेचे उपाध्यक्ष शौनक पारिख यांच्यासह उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेसाठी आधुनिक सुविधा

भारताच्या एकूण रत्न व आभूषण निर्यातीपैकी ५० टक्क्यांहून अधिक निर्यात महाराष्ट्रातून, विशेषतः मुंबईतून होते, असे फडणवीस यांनी नमूद केले. मुंबईतील झवेरी बाजार आणि भारत डायमंड बोर्स यांसारख्या केंद्रांमुळे राज्यात या उद्योगाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. मात्र, जागतिक व्यापारातील बदल आणि अमेरिका व चीनसारख्या मोठ्या बाजारपेठांमधील घडामोडींमुळे उद्योगांसमोर नवी आव्हाने निर्माण होत आहेत. या परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनातील नावीन्य आणि निर्यातीच्या नव्या संधींचा शोध घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

### गुंतवणुकीतून रोजगारनिर्मितीवर भर

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इंडिया ज्वेलरी पार्क हा केवळ उत्पादन प्रकल्प नसून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा उपक्रम असल्याचे सांगितले. राज्याच्या जेम्स अँड ज्वेलरी धोरणातून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे, पाच लाख रोजगार निर्माण करणे आणि रत्न व आभूषण क्षेत्रातील निर्यात दुप्पट करणे अशी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. सोन्याची गुंतवणूक तिजोरीत केल्यास संपत्ती वाढते; मात्र ती उद्योगात केल्यास रोजगार आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळते, असे सांगत त्यांनी उत्पादन क्षेत्रातील गुंतवणुकीचे महत्त्व अधोरेखित केले.

# पुण्यात डेंग्यूचे सव्वादोन हजारांवर रुग्ण!

## १४ लाख घरांची तपासणी; डासांच्या अळ्या आढळलेल्या मिळकतींकडून सहा लाखांचा दंड वसूल

**महाईन्यूज । पुणे**

**शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढत असल्याने महापालिकेचा आरोग्य विभाग दक्ष झाला असून, डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढू नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरात या वर्षी २० ऑक्टोबरपर्यंत डेंग्यूच्या २,२९१ रुग्णांची नोंद झाली आहे. डेंग्यूच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी महापालिकेने आवश्यक खाटा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच, महापालिकेच्या सर्व दवाखान्यांमध्ये डेंग्यूच्या निदानासाठी रॅपिड डायग्नोस्टिक किट्स (आरडीके) तपासणी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.**



‘शहरात गेल्या काही दिवसांपासून डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून आवश्यक ती उपाययोजना केली जात आहे. डेंग्यूचे निदान तातडीने व्हावे, यासाठी महापालिकेच्या रुग्णालयात मोफत तपासणी केली जात आहे,’ असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले. आयुक्तांनी बाणेर येथील डॉ. नायडू संसर्गजन्य आजार रुग्णालयाला भेट देऊन डेंग्यू प्रतिबंधक उपाययोजना, रुग्णसंख्या, औषधसाठा आणि खाटांच्या उपलब्धतेचा आढावा घेतला.

‘पुणे शहरातील खासगी रुग्णालयांत ४,४०९, तर महापालिका रुग्णालयांत ३३३ खाटा डेंग्यूच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता डेंग्यूची लक्षणे आढळल्यास तातडीने उपचार घ्यावेत,’ असे आवाहन राम यांनी केले. तसेच, महापालिकेच्या आरोग्य, बांधकाम, अतिक्रमण आणि घनकचरा व्यवस्थापन विभागांनी समन्वयाने काम करून डासोत्पत्ती रोखण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, शहरात २०२४ मध्ये डेंग्यूचे ४,९०८ रुग्ण होते. गेल्या वर्षी ही संख्या २,३९१ इतकी होती. यंदा १ जानेवारी ते २० ऑक्टोबर या कालावधीत २,२९१ रुग्ण आढळले. डेंग्यूचा धोका कायम असल्याने महापालिका प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला आहे. वातावरणातील बदल, वाढती बांधकामे, पाणीकपातीमुळे घरांमध्ये पाणी साठविण्याचे वाढलेले प्रमाण याकडे विशेष लक्ष दिले जात असल्याचे आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### चौदा लाख घरांची तपासणी; 6 लाखांचा दंड

डेंग्यू प्रतिबंधासाठी महापालिकेच्या पथकांनी शहरातील सुमारे १४ लाख घरांना भेट देऊन २८ लाख ३१ हजार ३८६ पाणी साठवण कंटेनरची तपासणी केली. यामध्ये सुमारे १३ हजार घरांमध्ये १८,८८५ कंटेनरमध्ये डासांच्या अळ्या आढळल्या. याप्रकरणी २,६६४ मिळकतींना नोटिसा बजाविण्यात आल्या असून, संबधितांकडून ६ लाख ३० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

---

## शहर रक्तटंचाईच्या उंबरठ्यावर, औंध जिल्हा रुग्णालयात चार दिवस पुरेल इतकेच रक्त

**महाईन्यूज । पुणे**

**सणासुदीच्या उत्साहात रक्तदानाकडे दुर्लक्ष झाल्यास पुणे शहराला दिवाळीत रक्तटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. औंध जिल्हा रुग्णालयात केवळ पाच दिवस पुरेल इतकाच रक्तसाठा शिल्लक असून, कमला नेहरू रुग्णालयातील रक्तसाठाही सुमारे २०० पिशव्यांवरून ८० पिशव्यांपर्यंत खाली आला आहे. खासगी रक्तपेढ्यांमध्येही साधारण दहा ते बारा दिवस पुरेल एवढाच साठा उपलब्ध असल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या परिस्थिती गंभीर नसली, तरी पुढील दहा ते पंधरा दिवसांत रक्तसाठ्याची भरपाई न झाल्यास दिवाळीत तुटवडा जाणवू शकतो, असा इशारा रक्तपेढ्यांनी दिला आहे.**




औंध जिल्हा रुग्णालयात सध्या रक्ताच्या केवळ ७० पिशव्या उपलब्ध आहेत. रुग्णालयात दररोज १२ ते १४ पिशव्यांची गरज भासते. त्यामुळे उपलब्ध साठा जेमतेम चार दिवस पुरण्याची शक्यता आहे. सध्या मोठी रक्तदान शिबिरे होत नसल्याने रक्तसाठा वाढविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. रक्तदाते मिळविण्यासाठी खासगी रक्तपेढ्यांची मदत घेण्याची वेळ रुग्णालयाच्या रक्तपेढीवर आली आहे. कमला नेहरू रुग्णालयातही रक्तसाठा घटला असून, दिवाळीपूर्वी मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिरे आयोजित करण्याची गरज व्यक्त होत आहे.

दसरा-दिवाळीच्या काळात दरवर्षी रक्तसंकलनात घट होते. सणांचा माहोल, सुट्ट्यांमुळे बाहेरगावी जाणारे नागरिक आणि रक्तदान शिबिरांचे कमी झालेले आयोजन याचा परिणाम रक्तसाठ्यावर होतो. जनकल्याण रक्तपेढीच्या माहितीनुसार, दिवाळीपर्यंत सध्या उपलब्ध साठा पुरू शकतो; मात्र पुढील दहा ते पंधरा दिवसांत पुरेसा रक्तसाठा उभारला नाही, तर ऐन सणात टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. पुण्यातील विविध रक्तपेढ्यांमध्ये साठ्याची स्थिती दररोज बदलत असल्याने उपलब्धतेचे नियमित निरीक्षण केले जाते.

थॅलेसेमियाग्रस्त मुलांना साधारण दर पंधरा दिवसांनी रक्त द्यावे लागते. याशिवाय कर्करोग, रक्ताचा कर्करोग, हृदयाच्या शस्त्रक्रिया, अवयव प्रत्यारोपण, अपघात, प्रसूतीदरम्यान होणारा रक्तस्राव आणि नवजात बालकांच्या उपचारांसाठी रक्ताची गरज असते. पुण्यात उपचारांसाठी बाहेरच्या जिल्ह्यांतूनही मोठ्या संख्येने रुग्ण येतात. त्यामुळे शहरातील रक्ताची गरज अधिक आहे. जनकल्याण रक्तपेढीशी वर्षभरात सुमारे २५ ते ३० हजार रक्तदाते जोडले जातात; तरीही सणासुदीच्या काळात साठा टिकविण्याचे आव्हान कायम असते.

### सोसायट्या, कार्यालयांत शिबिरांचे आवाहन

मोठ्या शिबिरांची वाट न पाहता सोसायट्या, कार्यालये आणि मित्रपरिवाराच्या माध्यमातून लहान रक्तदान शिबिरे आयोजित करावीत. नागरिकांनी जवळच्या मान्यताप्राप्त रक्तपेढीत जाऊनही रक्तदान करावे. दिवाळीपूर्वी रक्तसाठा वाढविण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज रक्तपेढ्यांनी व्यक्त केली आहे.

# इंद्रायणीनगरमध्ये आरोग्य सुविधांना मिळणार बळ!

## आरोग्य मंदिराचे काम सुरू; उर्वरित जागेवर सुसज्ज दवाखान्यासाठी डॉ. सुहास कांबळेंचा पुढाकार

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्रमांक ८ मधील सेक्टर क्रमांक २, इंद्रायणीनगर येथे नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. नियोजित महानगरपालिका दवाखान्यासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्र उभारण्याचे काम सुरू झाले आहे. या कामाची तसेच प्रस्तावित मनपा दवाखान्याच्या जागेची नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. परिसरातील नागरिकांना लवकरात लवकर आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कांबळे यांनी पुढाकार घेतला आहे.**



> “इंद्रायणीनगर आणि परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या जवळच उपलब्ध व्हाव्यात, हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. महानगरपालिका दवाखान्यासाठी २२ गुंठे जागा आरक्षित असून, त्यापैकी दोन गुंठे जागेवर नागरी आयुष्मान आरोग्य मंदिराचे काम सुरू झाले आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, परिसराची गरज लक्षात घेता उर्वरित जागेवर स्वतंत्र आणि सुसज्ज महानगरपालिका दवाखान्याची इमारत उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी मी आमचे नेते आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले असून, दवाखान्याच्या इमारतीचे काम लवकरात लवकर सुरू व्हावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. नागरिकांना प्राथमिक उपचारांसह आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत आणि सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> **- डॉ. सुहास कांबळे,** नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

### २२ गुंठे आरक्षित जागेवर स्वतंत्र दवाखान्याची मागणी

इंद्रायणीनगर येथील नियोजित महानगरपालिका दवाखान्यासाठी एकूण २२ गुंठे जागा आरक्षित आहे. यापैकी दोन गुंठे जागेवर नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्र उभारण्यात येत आहे. मात्र, परिसरातील नागरिकांना अधिक व्यापक आणि नियमित वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी उर्वरित जागेवर स्वतंत्र महानगरपालिका दवाखान्याची इमारत उभारणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी उर्वरित जागेवर नवीन मनपा दवाखान्याची इमारत लवकरात लवकर बांधण्यात यावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले असून, दवाखान्याच्या उभारणीसाठी प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे.

इंद्रायणीनगर परिसरातील वाढती लोकसंख्या आणि नागरिकांची आरोग्यविषयक गरज लक्षात घेता, स्थानिक पातळीवरच वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. याच अनुषंगाने महानगरपालिकेच्या नियोजित दवाखान्यासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर आरोग्य मंदिर केंद्राचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामाची पाहणी करताना डॉ. कांबळे यांनी कामाच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. यावेळी त्यांच्यासोबत सहकारी मित्र डॉ. पोटे तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

### स्थानिक नागरिकांना मिळणार दिलासा

नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्र सुरू झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्यविषयक सेवा मिळण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर उर्वरित जागेवर स्वतंत्र मनपा दवाखान्याची इमारत उभारल्यास नागरिकांना अधिक व्यापक आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे नागरिकांना उपचारांसाठी दूरच्या रुग्णालयांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होण्यास मदत होईल.

आरोग्य मंदिर केंद्राचे काम आणि प्रस्तावित दवाखान्याच्या इमारतीची उभारणी या दोन्ही बाबींना गती मिळावी, यासाठी डॉ. सुहास कांबळे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका घेतली आहे. आता महानगरपालिका प्रशासन या मागणीवर काय कार्यवाही करते आणि स्वतंत्र दवाखान्याच्या उभारणीला कधी सुरुवात होते, याकडे इंद्रायणीनगरमधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# १० टक्के पाणीकपात सुरू, नाशिक फाट्यावर पाण्याचे पाट!

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेने अधिकृतपणे १० टक्के पाणीकपात लागू करून नागरिकांना 'थेंब थेंब पाणी जपून वापरा' असा सल्ला दिला आहे. मात्र, दुसरीकडे प्रशासकीय नियोजन आणि अनास्थेमुळे शहरातील रस्त्यांवर लाखो लिटर पिण्याचे पाणी वाहून जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.**

नाशिक फाटा सिग्नल येथे मुख्य पाईपलाईनमधून प्रचंड प्रमाणात पाणीगळती सुरू असून, पाण्याचे पाट रस्त्यावरून वाहत आहेत. यामुळे महापालिकेचा कारभार म्हणजे ‘लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडे पाषाण’ अशी चर्चा नागरिकांत सुरू आहे. एकीकडे नळाला पुरेसे पाणी येत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना महागड्या दराने खासगी टँकर मागवून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, तर दुसरीकडे महापालिकेच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे शुद्ध पाण्याचा अमूल्य साठा वाया जात आहे. या प्रकारामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचा नाकर्तेपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.



> सदर ठिकाणी एमआयडीसीच्या दोन जोडण्या असून, वल्लभनगर टाकी तसेच एमआयडीसी येथून पाणीपुरवठा केला जातो. संबंधित जलवाहिनी 40 ते 45 वर्षे जुनी आहे. पाण्याचा प्रवाह सुरू असतानाच रबरी कपलिंगच्या साह्याने तातडीने दुरुस्ती करण्यात आली असून, त्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. संबंधित ठिकाणी पाणी पुलापर्यंत गेले होते. जलवाहिनीचे कायमस्वरूपी वेल्डिंग करण्यासाठी पाणीपुरवठा बंद ठेवावा लागणार आहे.
>
> **- महेश बरिदे,** कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महापालिका



## भूमिका

**तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे पत्रकारितेचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे. मोबाइल, समाजमाध्यमे आणि माहिती अधिकार कायद्यामुळे सामान्य नागरिकांनाही घटनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याची संधी मिळाली आहे. कालपर्यंत बातम्यांचे केवळ ग्राहक असलेले नागरिक आज बातम्यांचे निर्माते बनले आहेत.**

# जनपत्रकारितेचे स्वातंत्र्य जपायलाच हवे



याच प्रक्रियेतून जनपत्रकारिता उदयास आली असून, ती लोकशाहीतील प्रभावी माध्यम ठरत आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर परिसरातील विद्यार्थी आंदोलनादरम्यान मुक्त पत्रकार, यूट्यूबर्स आणि जनपत्रकारांना पोलिसांकडून झालेल्या वागणुकीमुळे त्यांच्या अधिकारांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पत्रकार नेमका कोणाला म्हणायचे, हा प्रश्न उपस्थित करताना सर्वोच्च न्यायालयानेही या विषयाचे गांभीर्य अधोरेखित केले. मात्र, पत्रकारितेची व्याख्या ठरवताना केवळ माध्यमसंस्थांमध्ये काम करणाऱ्यांनाच महत्त्व देणे योग्य ठरणार नाही. रस्त्यांवरील समस्या दाखवणारी शाळकरी मुलगी, सरकारी गैरव्यवहार उघड करणारा नागरिक किंवा अन्यायाची दृश्ये समाजमाध्यमांवर प्रसारित करणारा मुक्त पत्रकार हेही सार्वजनिक प्रश्न मांडण्याचे काम करतात. मुख्य प्रवाहातील माध्यमांकडून अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या समस्यांना जनपत्रकारितेमुळे वाचा फुटते. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याची आणि प्रशासनाला जबाबदार धरण्याची लोकशाही प्रक्रिया अधिक बळकट होते.

मात्र, जनपत्रकारितेचे महत्त्व मान्य करताना तिच्यातील त्रुटींकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. अपुऱ्या माहितीवर आधारित बातम्या, अप्रमाणित दावे आणि एकांगी मांडणी यामुळे समाजात संभ्रम निर्माण होऊ शकतो. त्यामुळे बातमीची सत्यता पडताळणे, संबंधितांची बाजू जाणून घेणे आणि जबाबदारीने माहिती प्रसारित करणे आवश्यक आहे. हे निकष जनपत्रकारांबरोबरच मुख्य प्रवाहातील माध्यमांनाही समानपणे लागू झाले पाहिजेत.

जनपत्रकारांना संरक्षण देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची गरज असली, तरी त्यांचा वापर अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध आणण्यासाठी होऊ नये. सरकारच्या बाजूने बोलणाऱ्यांचे स्वागत आणि सरकारवर टीका करणाऱ्यांवर कारवाई, असा दुहेरी निकष लोकशाहीला घातक ठरू शकतो. टीका सहन करण्याची क्षमता हीच लोकशाही व्यवस्थेची खरी कसोटी आहे.

जनपत्रकारितेवर नियंत्रण ठेवण्यापेक्षा तिच्यातील जबाबदारी वाढवणे महत्त्वाचे आहे. सत्यता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा आग्रह धरताना नागरिकांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण झाले पाहिजे. कारण पत्रकारितेचे स्वातंत्र्य हे केवळ पत्रकारांचे हित नसून, सामान्य नागरिकांच्या माहिती जाणून घेण्याच्या अधिकाराशीही जोडलेले आहे. जनपत्रकारितेचे हे जंतर-मंतर लोकशाहीला अधिक सक्षम करणारे ठरावे; ते दडपशाहीचे साधन बनू नये.

## प्रासंगिक »

### प्रामाणिक साक्षीदार

**एका गावात मोहन नावाचा कुंभार राहत होता. एके दिवशी बाजारातून घरी परतताना त्याला रस्त्याच्या कडेला पैशांनी भरलेली पिशवी सापडली. पिशवीत मोठी रक्कम आणि एका व्यापाऱ्याचे ओळखपत्र होते.**

मोहनची आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्याच्या मुलीच्या शिक्षणासाठीही पैसे कमी पडत होते. तरीही त्याने पिशवी स्वतःकडे ठेवली नाही.

दुसऱ्या दिवशी तो ओळखपत्रावरील पत्त्यावर गेला. व्यापारी आपली पिशवी हरवल्यामुळे चिंतेत होता. मोहनने पिशवी त्याच्या स्वाधीन केली. व्यापाऱ्याने आनंदाने त्याला बक्षीस देऊ केले; पण मोहन म्हणाला, “मी माझे कर्तव्य केले आहे. त्यासाठी बक्षिसाची अपेक्षा नाही.”

व्यापारी त्याच्या प्रामाणिकपणाने प्रभावित झाला. काही दिवसांनी त्याने मोहनला आपल्या दुकानासाठी मातीच्या भांड्यांची नियमित ऑर्डर दिली. त्यामुळे मोहनच्या व्यवसायाला चांगली चालना मिळाली. त्याच्या मुलीचे शिक्षणही व्यवस्थित सुरू राहिले.

- तात्पर्य : प्रामाणिकपणामुळे विश्वास निर्माण होतो आणि सन्मान मिळतो.

युद्ध म्हटले की डोळ्यांसमोर येतात ते बॉम्बहल्ले, रक्तपात, उद्ध्वस्त इमारती आणि मृत्यूचे तांडव. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानामुळे युद्धभूमीवर मृत्यूचे साधन ठरणारे ड्रोन आता जीव वाचवण्यासाठीही उपयोगी पडू लागले आहेत.

# युद्धभूमीवर ड्रोन ठरला जीवनदाता!



रशिया-युक्रेन युद्धात जखमी सैनिकाची ड्रोनच्या मदतीने करण्यात आलेली सुटका ही त्याचीच थरारक आणि आशादायी प्रचिती आहे. युद्धतंत्रज्ञानाचा मानवी कल्याणासाठी कसा उपयोग होऊ शकतो, हे या घटनेने दाखवून दिले आहे.

युक्रेनचा सैनिक कोस्त्यांतिन व्लासेंको तब्बल ४९१ दिवस युद्धभूमीवर अडकून पडला होता. रशियन सैन्याचा वेढा, जमिनीवर पेरलेले सुरुंग आणि सतत घिरट्या घालणारे ड्रोन यांमुळे त्याची सुटका करणे अत्यंत कठीण झाले होते. ड्रोन हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या व्लासेंकोला स्वतःचा पाय कापण्याची वेळ आली. अशा भयावह परिस्थितीतही युक्रेनी सैन्याने त्याच्यापर्यंत अन्न, पाणी आणि औषधे पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. अखेर पारंपरिक बचावपद्धती अपयशी ठरल्यानंतर तंत्रज्ञानाच्या मदतीने त्याला सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

या मोहिमेचे महत्त्व केवळ एका सैनिकाचा जीव वाचवण्यापुरते मर्यादित नाही. युद्धभूमीवर जखमी सैनिकांपर्यंत पोहोचताना बचाव पथकांनाही जीव धोक्यात घालावा लागतो. शत्रूची नजर, गोळीबार, सुरुंग आणि दुर्गम भौगोलिक परिस्थिती यांमुळे मदत पोहोचवणे अनेकदा अशक्य होते. अशा वेळी वजन उचलू शकणारे ड्रोन, कॅमेरे आणि संपर्क यंत्रणा बचावकार्यात नवी दिशा देऊ शकतात. भविष्यात अशा तंत्रज्ञानाचा वापर आपत्ती व्यवस्थापन, दुर्गम भागांतील वैद्यकीय मदत आणि नैसर्गिक संकटांमध्येही प्रभावी ठरू शकतो.

मात्र, तंत्रज्ञानाच्या या प्रगतीची दुसरी बाजूही तितकीच चिंताजनक आहे. ड्रोनचा वापर अचूक हल्ले करण्यासाठी, टेहळणीसाठी आणि विनाश घडवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे युद्ध अधिक घातक बनत असून सामान्य नागरिक आणि सैनिकांचे जीव धोक्यात येत आहेत. ज्या तंत्रज्ञानातून जीव वाचवता येतो, त्याच तंत्रज्ञानाचा वापर जीव घेण्यासाठी केला जात आहे, ही आधुनिक युद्धाची शोकांतिका आहे.

व्लासेंकोची सुटका आशेचा किरण दाखवते; पण युद्धातील मानवी वेदना कमी करण्यासाठी केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही. युद्ध थांबवण्यासाठी संवाद, मुत्सद्देगिरी आणि शांततेचे प्रयत्नही आवश्यक आहेत. कारण कोणतेही यंत्र माणसाचा जीव वाचवू शकते; मात्र युद्धामुळे निर्माण झालेल्या वेदना आणि विनाश संपवण्याची खरी ताकद शांततेतच आहे.

## ।। अभंगवाणी ।।



पंढरीचा महिमा ।
देतां आणीक उपमा ॥१॥

ऐसा ठाव नाहीं कोठें ।
देव उभाउभी भेटे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दिवाळीच्या तोंडावर मुंढेंची राज्यभरात विशेष मोहीम!

## अन्न व औषध प्रशासनाकडून १७ कोटींचा माल जप्त; ६८ परवाने निलंबित

महाईन्यूज । मुंबई

**दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असताना महाराष्ट्रातील भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने मोठी धडक कारवाई सुरू केली आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात विशेष मोहीम राबवली जात असून, आतापर्यंत १६.९२ कोटी रुपयांचा संशयास्पद व भेसळयुक्त साठा जप्त करण्यात आला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करत एफडीएने ६८ आस्थापनांचे परवाने निलंबित केले आहेत, तर नियमभंग करणाऱ्या ७ उत्पादन युनिट्सना थेट टाळे ठोकले आहे.**





वृत्तानुसार, दिवाळीच्या काळात मिठाई, खवा, गोडेतेल, सुकामेवा आणि फराळाच्या पदार्थांना मोठी मागणी असते. याच पार्श्वभूमीवर मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या सहा विभागांमध्ये एफडीएने तपासणी मोहीम राबवली होती. या मोहिमेदरम्यान ८,३९२ किलो मुदत संपलेला आणि खराब झालेला अन्नसाठा जप्त करून नष्ट करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी राज्यभरात २२ गुन्हे दाखल करण्यात आले असून २० जणांना अटक करण्यात आली आहे.

याआधी पार पडलेल्या नवरात्रोत्सवात एफडीएने तब्बल ९.११ कोटी रुपयांचा संशयास्पद अन्नसाठा जप्त केला होता. याशिवाय राज्यभरात बंदी असलेला गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या बेकायदेशीर विक्रीविरोधातही धडक कारवाई करत ३.१५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विभागनिहाय कारवाईत छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक म्हणजे ४.१९ कोटी रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. फेकून दिलेला किंवा खराब झालेला माल पुन्हा बाजारात आणल्यास संबंधित व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा एफडीएने दिला आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर विभागातील एफडीए पथकाने पुणे-पंढरपूर रस्त्यावर माळशिरस जवळ एका वाहनावर (MH 25 AJ 4023) छापा टाकला. धाराशिव जिल्ह्यातील तीन वेगवेगळ्या उत्पादकांकडून तयार केलेला १,३३७ किलो खवा या वाहनातून सातारा येथील घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांकडे पाठवला जात होता.

योग्य ती खबरदारी न घेता आणि अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करून हा खवा वाहतूक केला जात असल्याचे तपासणीत उघड झाले. खवा हा नाशवंत पदार्थ असल्याने आणि भेसळीचा संशय असल्याने अंदाजे ४.८१ लाख रुपये किमतीचा हा संपूर्ण साठा खड्ड्यात गाडून नष्ट करण्यात आला.

### दिवाळीपर्यंत एफडीएची नजर कायम राहणार

दिवाळीची खरेदी आणखी काही दिवस चालणार असल्याने एफडीएची ही विशेष तपासणी मोहीम अशीच सुरु राहणार आहे. विशेषतः खवा, मावा, दुग्धजन्य पदार्थ, गोडेतेल आणि तयार फराळाचे नमुने तपासण्यावर भर दिला जात आहे. नियम मोडणाऱ्या आणि नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या घटकांवर परवाना रद्द करणे, दुकाने सील करणे आणि कायदेशीर खटले दाखल करणे अशी कठोर कारवाई करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

## "कर्जतचा प्रकल्प पर्यावरणपूरकच विरोधकांचा फेक नरेटिव्ह महाराष्ट्र विरोधी"; मुख्यमंत्री

महाईन्यूज । मुंबई

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कर्जत येथील उर्जा प्रकल्पाबाबत विचारलं असता त्यांनी विरोधक महाराष्ट्र विरोधी धोरणाने फेक नरेटिव्ह पसरवत आहेत अशी टीका त्यांनी केली. तसंच १८ महिने सगळ्या सुनावण्यांना सामोरं जाऊन आणि कायदेशीर मंजुरीनंतरच प्रकल्प केला जातो आहे असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.**




इंडिया ज्वेलरी पार्क याचं महापेत भूमिपूजन केलं.४० हजार ते ५० हजार कोटींची गुंतवणूक करतो आहोत. या ठिकाणी १ लाख नोकऱ्या मिळू शकणार आहेत. देशातला सर्वात मोठा पार्क हा असणार आहे. सातत्याने वेगवेगळे नरेटिव्ह तयार केले जातात. त्यामुळेच मी म्हटलं की देशाच्या एकूण एक्सपोर्टमध्ये ५८ टक्के गोष्टी भारत एक्सपोर्ट करतो आहे. काहीही आरोप केले जात आहेत तरीही या क्षेत्रात महाराष्ट्रातला क्लिअर लीडर आहे. जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट काउन्सिलने जागा आम्हाला मागितली होती. हा पार्क तयार झाल्यानंतर जेम्स आणि ज्वेलरीच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर राहिल.

भीमाशंकर अभयारण्यात बेसुमार वृक्षतोड केली जाते आहे अशी चर्चा आहे. त्याबाबत मुख्यमंत्र्यांना विचारलं असता ते म्हणाले फेक नरेटिव्ह याशिवाय याला काहीही म्हणता येणार नाही. आपल्याकडे पंप स्टोरेज म्हणजे हायडल पॉवर ही क्लिन पॉवर आहे. प्रदूषण न करणारी ही उर्जा आहे. आज आपण विचार केला तर जास्त क्षमता आपण सोलारची आहे. पण आपला पिक अवर सोलारच्या नंतर असतो. त्यासाठी कोळशाची वीज वापरली तर प्रदूषण होतं. पण क्लिन एनर्जी वापरण्याच्या दृष्टीनेच हा प्रकल्प आहे. ज्या प्रकल्पात ३ हजार मेगावॅट वीज तयार होणार आहे. ही पूर्णपणे क्लिन एनर्जी आहे. जी जागा घेतली आहे तिथे तलाव तयार केले जाणार आहेत. त्याच्या बदल्यात तीनपट जागा कंपनीने वन विभागाला दिलेली आहे. वनविभाग ३० हजार झाडं आणि ६० हजार झाडं अशी ९० हजार झाडं लावणार आहे. जर ही वीज मिळाली नाही तर आपल्याला कोळशाची वीज घ्यावी लागेल. त्यातून जे प्रदूषण टाळायचं असेल तर २८ कोटी झाडं लावावी लागतील. दुसरी बाब आपण जर एकूण ३ हजार मेगावॅटमधून थर्मल पॉवर मधून किती प्रदूषण होतं ४० लाख गाड्या जेवढं प्रदूषण करतील तेवढं प्रदूषण यातून होईल. त्यामुळे आपण क्लिन एनर्जीचा प्रकल्प आणतो आहोत असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

### राजकारणासाठी फेक नरेटिव्ह पसरवला जातोय

आपण पर्यावरण पुरक प्रकल्प आणतो आहोत. सगळी गुंतवणूक महाराष्ट्रात आहे, उर्जा पहिला अधिकारही पहिला महाराष्ट्राचा आहे. भीमाशंकर जंगलापासून प्रकल्प १६ किमी अंतरावर तर मंदिरापासून प्रकल्प २० किमी अंतरावर आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला क्लिन एनर्जी मिळू शकणार आहे. पण खोटा नरेटिव्ह तयार करायचा हे महाराष्ट्रविरोधी काम आहे. कुठलीही उपजिवीका नष्ट होणार नाही. जर तसं होणार असेल तर त्याचाही विचार केला जाईल. हा प्रकल्प एका दिवसांत तयार झालेला प्रकल्प नाही. १८ महिने सुनावणीनंतर हा प्रकल्प मंजूर झाला आहे. तरीही जे ग्रामस्थांचं म्हणणं असेल ते ऐकून घेऊ आणि मार्ग काढू. समाजातला कुठलाही वर्ग वंचित राहू नये यासाठीच हा प्रकल्प आहे. पण राजकारणासाठी जो फेक नरेटिव्ह पसरवला जातो आहे तो प्रयत्न काही योग्य नाही असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# युरोपमध्ये महागाईचा भडका!

## फ्रान्स, इटली, पोर्तुगाल, स्पेन, अल्बानियात लाखो नागरिक रस्त्यावर, पोलिसांशी तीव्र चकमक

महाईन्यूज । युरोप

**युरोपातील अनेक देशांमध्ये वाढती महागाई, परवडणाऱ्या घरांचा प्रश्न, निवृत्तीवेतन, शिक्षणाचा घसरता दर्जा, भ्रष्टाचार आणि युद्धाच्या विरोधात हजारो नागरिकांनी शनिवार-रविवारी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. फ्रान्स, अल्बानिया, इटली, स्पेन आणि पोर्तुगालमध्ये मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली. काही ठिकाणी आंदोलक आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाल्याने सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली.**




सरकारी भ्रष्टाचाराविरोधात कारवाई, शिक्षण क्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ, सार्वजनिक निवृत्तीवेतनाचे संरक्षण आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या मागण्यांसाठी आंदोलकांनी आवाज उठवला. काही ठिकाणी आंदोलने शांततेत पार पडली, तर अन्य ठिकाणी आंदोलकांनी पोलिसांवर वस्तू फेकल्या, जाळपोळ केली आणि सार्वजनिक तसंच खासगी मालमत्तेचं नुकसान केलं. यापूर्वी झालेल्या आंदोलनांतील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर काही भागांत अतिरिक्त पोलिसांसह सैनिकही तैनात करण्यात आले.

फ्रान्समध्ये शनिवारी झालेल्या आंदोलनांदरम्यान जवळपास एक हजार जणांना अटक करण्यात आल्याची माहिती देशाचे गृहमंत्री लॉराँ न्युनेझ यांनी दिली. अटक केलेल्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितलं. सरकारच्या अंदाजानुसार, देशभरातील आंदोलनांमध्ये सुमारे ४ लाख १० हजार नागरिक सहभागी झाले होते. मात्र, आयोजकांनी हा आकडा जवळपास ८ लाख असल्याचा दावा केला.

फ्रान्स २४ च्या वृत्तानुसार, पॅरिसमधील कोर्स द व्हिन्सेन्स परिसरात आंदोलक आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाल्यानंतर प्रशासनाने मोर्चा संपल्याची केल्याची घोषणा केली. आंदोलकांनी पोलिसांवर वस्तू फेकल्यानंतर पोलिसांनी पाण्याच्या तोफा आणि अश्रुधुराचा वापर केला. उपद्रवी गटांचा शोध घेण्यासाठी आणि जमिनीवरील पोलिसांना मदत करण्यासाठी जेंडरमेरीचे हेलिकॉप्टर तैनात करण्यात आल्याचं स्थानिक पोलीस प्रशासनाने सांगितलं. आंदोलनाच्या अखेरीस ५०० हून अधिक उपद्रवी व्यक्ती उपस्थित असल्याचा दावाही पोलिसांनी केला. फ्रान्समधील डाव्या विचारसरणीचे नेते आणि राष्ट्राध्यक्षपदाचे संभाव्य उमेदवार जॉँ-ल्युक मेलाँशाँ यांनी पोलिसांच्या कारवाईवर टीका केली. मोर्चाच्या मागील भागातील गर्दीवर पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला आणि गोळीबार केल्याचा आरोप त्यांनी केला. माध्यमे आंदोलनाची नकारात्मक प्रतिमा निर्माण करत असल्याचाही आरोप त्यांनी केला.

विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनामागे कथित सरकारी भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि शिक्षणाचा घसरता दर्जा यांविषयीचा संताप असल्याचं सांगितलं जात आहे. शाळा आणि विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क कमी करावं, शिक्षण क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक वाढवावी आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात कारवाई करावी, अशा मागण्या केल्या आहेत. यातील काही आंदोलकांनी पंतप्रधान एडी रामा यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या व्यापक आंदोलनालाही पाठिंबा दिला आहे.

### अल्बानियात सरकारविरोधी आंदोलन

अल्बानियाची राजधानी तिराना येथे हजारो नागरिक सरकारविरोधी आंदोलनासाठी रस्त्यावर उतरले. देशातील अन्य शहरांमध्येही आंदोलनांचा विस्तार झाला. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली आणि कृषी मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आग लावली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दंगल नियंत्रण पोलिसांनी अश्रुधूर, पाण्याच्या तोफा आणि रबराच्या गोळ्यांचा वापर केला. समोर आलेल्या दृश्यांमध्ये आंदोलक पोलिसांच्या दिशेने फटाक्यांच्या रॉकेटसदृश नळ्या डागताना दिसले. फटाक्यांचे स्फोटही झाले. काही आंदोलकांनी सरकारी इमारती आणि बँकांना लक्ष्य केले, दुकानांच्या काचा फोडल्या आणि रस्त्यावरील फरसबंदीचे दगड उखडून पोलिसांवर फेकले.

# '...तेव्हा श्रीलंका, बांगलादेशसारखी परिस्थिती उद्भवते'; सोनम वांगचुक

महाईन्यूज । नवी दिल्ली

**दिल्लीत मागील काही दिवसांपासून मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दिल्लीसह देशभरात विविध ठिकाणी आंदोलने सुरू आहेत. ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत असून त्या पार्श्वभूमीवर निदर्शने करण्यात येत आहेत. आता इंडिया आघाडीच्यावतीने पुन्हा एकदा १ नोव्हेंबर रोजी दिल्लीत रॅलीचं आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सांगितली जात आहे.**



निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आणि एसआयआरच्या विरोधात केल्या जाणाऱ्या आंदोलनातील आंदोलकांवर केंद्र सरकारकडून कठोर कारवाई होत असल्याच्या मुद्द्यांवरून आता सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे आक्रमक झाले आहेत. केंद्र सरकारकडून आंदोलकांवर होणाऱ्या कारवायांवर वांगचुक यांनी महत्वाचं भाष्य केलं आहे.

'जेव्हा शांततापूर्ण निदर्शने करण्याची परवानगी दिली जात नाही, तेव्हा श्रीलंका आणि बांगलादेशसारखी परिस्थिती उद्भवते', असं सूचक भाष्य सोनम वांगचुक यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना केलं आहे. लोकशाहीत आंदोलन रोखण्याऐवजी सरकारने जनतेचा आवाज ऐकला पाहिजे, असंही सोनम वांगचुक यांनी म्हटलं आहे.

"जगभरातील अनेक देश आनंदाने आंदोलनाला, निदर्शनांना परवानगी देतात, ते देखील थेट संसदेच्या समोर. युनायटेड किंगडम, नॉर्वे आणि स्वीडनसारख्या देशांमध्ये तर संसदेच्या अगदी समोर निदर्शने करण्याची परवानगी दिली जाते. भारतात मात्र आंदोलन करण्याची ठिकाणे संसदेपासून खूप दूर असतात. अगदी जंतर-मंतरसारख्या ठिकाणीही आंदोलन करायचं झाल्यास हे ठिकाणही संसदेपासून दूरच आहे", असं वांगचुक यांनी म्हटलं आहे.

"जेव्हा निदर्शनांना परवानगी दिली जात नाही, तेव्हा काय घडतं ते पाहा. श्रीलंका आणि बांगलादेश ही याची उदाहरणे आहेत", असं म्हणत सोनम वांगचुक यांनी श्रीलंका आणि बांगलादेशमध्ये घडलेल्या परिस्थितीचा आणि विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनांचा संदर्भ दिला. जर सरकारने अनावश्यक गोष्टी केल्या, तर लोक विरोधात जातील. त्यामुळे सरकारचंच नुकसान होईल. त्यामुळे जे योग्य आहे ते सरकारने केलं पाहिजे, असंही सोनम वांगचुक यांनी म्हटलं आहे.

### दिल्लीत काही दिवसांपासून आंदोलने

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेंद्र कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीत मागील काही दिवसांपासून आंदोलने सुरू आहेत. ज्ञानेंद्र कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. तसेच एसआयआर प्रक्रियेच्या विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने दिल्लीत मोठ्या प्रमाणावर सुरक्षा दल तैनात केलेलं आहे.



# रुक्मिणी पुन्हा चर्चेत!

कांतारा: चॅप्टर १ या चित्रपटातील अभिनयामुळे चर्चेत आलेली अभिनेत्री रुक्मिणी वसंत लवकरच एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दिग्दर्शक श्री कार्तिक यांच्या आगामी चित्रपटात ती मुख्य भूमिका साकारणार असून, तिच्या पात्राचे नाव 'थारा' असे आहे. या चित्रपटाचे नाव गुलदस्त्यात ठेवण्यात आले असून चित्रपटाच्या निर्मात्यांनी शुक्रवारी रुक्मिणी वसंतच्या सहभागाची घोषणा केली. या चित्रपटात तिच्यासोबत देव रामनाथ आणि विनायक वैथियानाथन हे कलाकारही महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये झळकणार आहेत. दिग्दर्शक श्री कार्तिक यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट शेअर करत रुक्मिणी वसंतचे स्वागत केले. तिच्यासोबत काम करण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले. 'ओका ओका जीवितम' या चित्रपटाप्रमाणेच आगामी चित्रपटही प्रेक्षकांच्या मनात कायमची जागा निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निर्मात्यांनी चित्रपटाच्या घोषणेसोबत एक खास व्हिडिओही प्रदर्शित केला आहे. या व्हिडिओमध्ये दिग्दर्शक श्री कार्तिक, देव रामनाथ आणि विनायक वैथियानाथन हे 'थारा'च्या भूमिकेसाठी योग्य कलाकाराची निवड करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. याचदरम्यान अचानक एक नोटिफिकेशन येते आणि तिघेही आश्चर्यचकित होतात. त्यानंतर रुक्मिणी वसंतची एंट्री होते. या व्हिडिओच्या माध्यमातून तिच्या 'थारा' या पात्राची पहिली झलक प्रेक्षकांना पाहायला मिळाली आहे.



# रश्मिका-विजयच्या घटस्फोटाची चर्चा!

अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा यांच्या नात्याबाबत सोशल मीडियावर विविध चर्चा सुरू आहेत. विजय यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर सध्या कोणालाही फॉलो केलेले नाही. त्यात रश्मिकाचाही समावेश आहे. त्यामुळे काही सोशल मीडिया युजर्सनी दोघांच्या नात्यात अडचणी असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. काहींनी तर लवकरच दोघांचा घटस्फोट होऊ शकतो, अशीही चर्चा सुरू केली. मात्र, या चर्चांना कोणताही अधिकृत आधार मिळालेला नाही. काही युजर्सनी विजय आणि रश्मिका यांनी सुरुवातीपासूनच इन्स्टाग्रामवर एकमेकांना फॉलो केले नसल्याचे सांगितले. त्यामुळे केवळ सोशल मीडिया फॉलोइंगवरून त्यांच्या नात्याबाबत निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. उपलब्ध माहितीनुसार, विजय देवरकोंडा यांच्या अकाउंटचा फॉलोइंग काउंट शून्य आहे. दुसरीकडे, रश्मिका मंदाना मात्र विजयला इन्स्टाग्रामवर फॉलो करत आहे. त्यामुळे दोघांनी एकमेकांना अनफॉलो केले असल्याचा दावा पूर्णपणे अचूक नसल्याचे दिसते. दरम्यान, विजय आणि रश्मिका अलीकडे 'कॉफी विथ करण ९' या लोकप्रिय चॅट शोमुळेही चर्चेत आले होते. या कार्यक्रमात विजयने रश्मिकाने त्याला लग्नासाठी सुमारे १०० वेळा विनंती केल्याचे सांगितले. रश्मिकानेही एका वर्षात वारंवार विजयला लग्नाबाबत विचारल्याचे म्हटले होते. या वक्तव्यांनंतर त्यांच्याबाबत सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटल्या.

# शिल्पा रावचा परफॉर्मन्स अर्धवट थांबवला!

गायिका शिल्पा रावने एका पेक्षा एक गाणी गात पार्श्वगायनाच्या स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. मात्र सध्या ती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. मुंबईत 'बॉलिवूड म्युझिक प्रोजेक्ट'च्या १० व्या वर्धापनदिन सोहळ्यातील शिल्पा राव लाईव्ह परफॉर्मन्स करणार होती. मात्र, २४ ऑक्टोबर रोजी झालेल्या कार्यक्रमाच्या वेळापत्रकात झालेल्या विलंबामुळे शिल्पा रावचा कार्यक्रम अर्धवट थांबवण्यात आला. स्टेजवरील लाईट्स अचानक बंद करण्यात आले आणि गायिकेचा माइकही बंद करण्यात आला. चाहते तिला ऐकण्यासाठी उत्सुक होते आणि तिच्या नावाचा जयघोष करत होते. मात्र, आयोजकांनी माइक पुन्हा चालू केला नाही. अखेर, गायिकेला तिचा परफॉर्मन्स थांबवावा लागला. या घडल्या प्रकारामुळे शिल्पा प्रचंड दु:खी झाली. त्यानंतर तिने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. शिल्पा रावने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लिहिले की, "आज मुंबईत



माझं हृदय तुटलं. तुमच्याकडून इतकं सुंदर व्यासपीठ असं हिरावून घेतलं जाणं, हे खूप हृदयद्रावक आहे. पण जेव्हा संगीत थांबलं, तेव्हाही तुम्ही सगळे थांबला नाहीत. तुम्ही माझं नाव घेत राहिलात आणि तुमच्या आवाजातलं प्रेम मला जाणवलं." तिने पुढे लिहिले की, "काल रात्रीची आपली कहाणी अपूर्ण राहिली. पण मी वचन देते की मी परत येईन. माझं मुंबईवर खूप प्रेम आहे आणि ते नेहमीच राहील.", असं म्हणत शिल्पा रावने तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. या कार्यक्रमादरम्यान घडलेल्या या प्रकारामुळे काही यूजर्सनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देत आयोजकांवर टीका केली.

# हरमनप्रीतनंतर दीप्ती शर्माचं जबरदस्त शतक

## १६ डिसेंबरला गोव्यात लिलाव होण्याची शक्यता; BCCIच्या मेसेजमधून माहिती समोर

**महाईन्यूज । बडोदा**

**वुमन्स टीम इंडियाची स्टार ऑलराउंडर दीप्ती शर्मा हीने बडोद्यातील बीसीए क्रिकेट स्टेडियममध्ये इतिहास घडवला आहे. दीप्तीने झिम्बाब्वे विरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावलं आहे. दीप्तीने सहाव्या स्थानी येत हे शतक झळकावलं. दीप्ती या सामन्यात भारतासाठी शतकी खेळी करणारी दुसरी फलंदाज ठरली. दीप्ती व्यतिरिक्त माजी कर्णधार हरमनप्रीत कौर हीने शतक केलं. या दोघींच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताला ५० षटकांमध्ये ६ विकेट्स गमावून ३२८ धावांपर्यंत मजल मारता आली.**



दीप्तीच्या एकदिवसीय कारकीर्दीतील हे दुसरं शतक ठरलं. दीप्तीला दुसऱ्या शतकासाठी तब्बल ९ वर्षांची प्रतिक्षा करावी लागली. दीप्तीने तिच्या एकदिवसीय कारकीर्दीतील पहिलं शतक हे २०१७ साली आयर्लंड विरुद्ध लगावलं होतं. त्यानंतर दीप्तीने आता झिम्बाब्वे विरुद्ध केलेलं शतक ऐतिहासिक असं ठरलं आहे. दीप्ती सहाव्या आणि त्याखालील स्थानी खेळून शतक करणारी पहिली भारतीय महिला फलंदाज ठरली. दीप्तीने त्याबाबतीत भारताची विकेटकीपर फलंदाज ऋचा घोष हीचा विक्रम मोडीत काढला. ऋचाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ९४ धावांची खेळी केली होती.

दीप्तीआधी हरमनप्रीतने शतक लगावलं. हरमनप्रीतने भारतासाठी सर्वाधिक धावा केल्या. हरमनप्रीतने १२१ चेंडूंच्या मदतीने १२६ धावा केल्या. हरमनप्रीतने या खेळीत १५ चौकार लगावले. दीप्ती आणि हरमनप्रीत या दोघींनी पाचव्या विकेटसाठी दीडशतकी भागीदारी केली. दोघांनी पाचव्या विकेटसाठी १३७ चेंडूत १५३ धावा जोडल्या. तसंच पहिल्या सामन्यात नाबाद शतक करुन भारताला विजयी करणाऱ्या ओपनर प्रतिका रावल हीने तडाखा कायम ठेवत अर्धशतक लगावलं. प्रतिकाने ६७ चेंडूत ६१ धावा केल्या. प्रतिकाने या खेळीत २ षटकार आणि ४ चौकार लगावले. हरमनप्रीत, दीप्ती आणि प्रतिका या तिघींव्यतिरिक्त भारताच्या एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. लेडी सेहवाग शफाली वर्मा आणि कर्णधार स्मृती मंधाना या दोघींनी निराशा केली. शफालीने ८ धावा केल्या. तर स्मृतीला भोपळाही फोडता आला नाही. तर इतरांनीही निराशा केली. मात्र हरमनप्रीत आणि दीप्तीने केलेल्या शतकामुळे भारताला ३०० पार मजल मारता आली.

### दीप्तीची शतकी खेळी

दीप्ती शर्मा हीने चौकार लगावून शतक पूर्ण केलं. दीप्तीने त्यानंतर ड्रेसिंग रुमच्या दिशेने बॅट उंचावली. दीप्तीने झिम्बाब्वे विरुद्ध ८६ चेंडूंचा सामना करत नाबाद शतकी खेळी केली. दीप्तीने एकूण १०६ धावा केल्या. दीप्तीने १०६ पैकी ६० धावा या चौकारांच्या मदतीने केल्या. दीप्तीने १५ चौकार लगावले.

# IND vs NZ T20 मालिकेदरम्यान स्टार वेगवान गोलंदाज पुढील ३ सामन्यांमधून बाहेर

**महाईन्यूज । मुंबई**

**भारताविरुद्ध सलग दोन टी-२० सामने गमावल्यानंतर न्यूझीलंड क्रिकेट संघाच्या अडचणींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. मालिकेत संघ आधीच ०-२ असा पिछाडीवर असताना, दुसरीकडे वेगवान गोलंदाजांच्या वर्कलोडचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने संघ व्यवस्थापनाने मोठा निर्णय घेतला आहे. उर्वरित सामन्यांसाठी गोलंदाजीच्या फळीत महत्त्वाचे बदल करण्यात आले असून, याचा मोठा फटका अनुभवी वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीला बसला आहे.**



क्राइस्टचर्च येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडला भारताकडून निसटत्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. या सामन्यानंतर गोलंदाजांचा शारीरिक ताण नियंत्रित ठेवण्याच्या रणनीतीचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला. हेन्रीने दुसऱ्या सामन्यात अवघी दोन षटके गोलंदाजी केली होती; मात्र पोटरीच्या स्नायूंमध्ये ताण जाणवू लागल्याने त्याला मैदान सोडावे लागले.

कर्णधार मिचेल सँटनरनेही या वृत्ताला दुजोरा देत त्याला स्नायूंच्या ताणाचा त्रास असल्याचे स्पष्ट केले. हेन्री सध्या क्राइस्टचर्च येथेच मुक्कामी राहणार असून, २ नोव्हेंबर रोजी ऑकलंडमध्ये तो एकदिवसीय संघात सामील होईल. उभय संघांमधील पहिला एकदिवसीय सामना ४ नोव्हेंबर रोजी खेळवला जाणार आहे.

दुसऱ्या बाजूला, धडाकेबाज वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन देखील तिसऱ्या टी-२० सामन्याला मुकणार आहे. दुसऱ्या सामन्यादरम्यान सावधगिरीचा उपाय म्हणून फर्ग्युसन मैदानाबाहेर गेला होता. तथापि, तो या मालिकेतून पूर्णपणे बाहेर पडलेला नाही. तिसऱ्या सामन्यात विश्रांती घेतल्यानंतर ऑकलंड आणि हॅमिल्टन येथे होणाऱ्या अखेरच्या दोन सामन्यांसाठी तो संघात पुनरागमन करेल. याखेरीज, काइल जेमिसनला मालिकेतील शेवटच्या दोन सामन्यांत खेळण्याची संधी मिळणार नाही. चालू टी-२० मालिकेत तो अद्याप एकाही सामन्यात मैदानात उतरलेला नाही. वेलिंग्टनमधील तिसऱ्या सामन्यानंतर जेमिसन तिथेच थांबून बेसिन रिझर्व्ह मैदानावर कॅन्टरबरी संघाकडून 'फोर्ड ट्रॉफी'चा सामना खेळणार आहे. त्यानंतर तो एकदिवसीय मालिकेसाठी राष्ट्रीय संघात रुजू होईल.

या पार्श्वभूमीवर न्यूझीलंडने वेगवान गोलंदाजीच्या ताफ्यात फेरबदल करत ब्लेअर टिकनरचा मालिकेतील अखेरच्या तिन्ही सामन्यांसाठी संघात समावेश केला आहे, तर जोश क्लार्कसन शेवटच्या दोन सामन्यांसाठी संघाशी जोडला जाईल. विशेष म्हणजे, झॅक फॉल्क्स आणि मार्क चॅपमन दुखापतग्रस्त झाल्यानंतर या दोघांचा १६ सदस्यीय चमूत पर्यायी खेळाडू म्हणून आधीच समावेश करण्यात आला होता. याशिवाय, मॅट फिशर तिसऱ्या टी-२० सामन्यासाठी राखीव खेळाडू म्हणून संघासोबत वेलिंग्टनला रवाना होणार आहे. याव्यतिरिक्त जेकब डफी, नॅथन स्मिथ आणि ॲडम मिल्ने हे गोलंदाजही संघात उपलब्ध असून, गरजेनुसार त्यांचा वापर केला जाणार आहे.

सध्या न्यूझीलंड संघ टी-२० मालिकेत ०-२ असा पिछाडीवर असल्याने त्यांच्यासमोर पुनरागमनाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या दृष्टीने वेलिंग्टन येथे होणारा तिसरा सामना संघासाठी निर्णायक ठरणार असून, पराभवाची मालिका खंडित करत मालिकेत टिकून राहण्याचा त्यांचा कसोशीने प्रयत्न असेल. टी-२० मालिकेनंतर दोन्ही देशांदरम्यान पाच सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि त्यानंतर दोन कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. या व्यस्त वेळापत्रकानंतर न्यूझीलंड संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार असून, तिथे त्यांना चार कसोटी सामने खेळायचे आहेत.



D Y PATIL
INTERNATIONAL
UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
SHAPE YOUR FUTURE.
LEAD WITH JUSTICE.
B.A. LL.B. (Hons.)
&
B.B.A. LL.B. (Hons.)
INTEGRATED 5 YEAR PROGRAMS
Build a Strong Foundation in Law.
Make an Impact.
Create Change.
ADMISSION OPEN 2026
School of Legal Studies
Experienced Faculty
Moot Court & Practical Training
Global Exposure & Collaborations
Legal Aid Support
APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA
+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in
Apply Now

# मोशीत १५१ एकरवर गोल्फ कोर्सचा घाट

## गोल्फ कोर्ससाठी ६१.३८ हेक्टर जागेवरील दहा आरक्षणे बदलण्याचा प्रस्ताव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात खेळांसाठी उत्तम मैदाने नाहीत. जे क्रीडांगण व स्टेडियम उपलब्ध आहेत, त्यांची योग्य निगा राखली जात नाही. नेहरूनगर, पिंपरी येथील सात वर्षांपासून पडून असलेले अण्णासाहेब मगर स्टेडियम बांधण्यास महापालिकेस वेळ नाही. अशी परिस्थिती असताना बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील तब्बल 151.67 एकर जागेत कोट्यवधी रुपये खर्चून गोल्फ कोर्सचे मैदान विकसित करण्याचा घाट घालण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शहरातील मैदाने, क्रीडांगणांची दुरवस्था झाली आहे. अनेक भागांत मुलांना खेळण्यासाठी चांगले मैदान उपलब्ध नाही. नाईलास्तव मुलांना मोकळ्या जागेत व रस्त्यावर खेळावे लागते. खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा शिक्षकांकडून वारंवार तक्रारी करूनही मैदान दुरूस्तीकडे कानाडोळा केला जात आहे.**




शहरात खेळांच्या सोयी-सुविधांबाबत समाधानकारक परिस्थिती नाही. नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडियम सन 2019 ला जमीनदोस्त करण्यात आले. त्या ठिकाणी वांद्रे-कुर्ला व्यापारी कॉम्प्लेसच्या धर्तीवर क्रीडा संकुल उभारण्यात येणार होते. त्याचे सादरीकरणही सर्व पदाधिकारी व गटनेत्यांसमोर तत्कालिन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी केले होते. मात्र, हा प्रकल्प पुढे काही सरकला नाही. त्यामुळे मगर स्टेडियमचे मैदान गेल्या सात वर्षापासून धूळ खात पडले आहे. सांगवी, नवी सांगवी, पिंपळे गुरव परिसरात महापालिकेचे खेळाचे एकही मैदान नसल्याने पीडब्ल्यूडीच्या मैदानावर सराव करावा लागत आहे.

असे असताना, महापालिकेकडून बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील 151.67 एकर जागेत गोल्फ कोर्स व क्लब विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रशासनासह सत्ताधारी आग्रही असल्याचे दिसत आहे. येत्या सर्वसाधारण सभेत त्याला मंजुरी मिळाल्यानंतर जुन्या आरक्षणात बदल करून गोल्फ कोर्स क्लबचे नवे आरक्षण टाकले जाणार आहे. त्या प्रकल्पासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. शहराला जागतिक दर्जावर ओळख मिळावी, हे कारण पुढे करून मोठ्या प्रमाणात खर्चाचा घाट घालण्यात आल्याने शहरवासीयांकडून रोष व्यक्त केला जात आहे.

### विकासकामांच्या आरक्षणांवर हातोडा

महापालिकेच्या विकास योजना आराखड्यात मोशी येथील गट क्रमांक 327, 435, 436, 437, 438, 439, 440, 441, 442, 443 या एकूण 61.38 हेक्टर जागेत विविध विकासकामांसाठी आरक्षणे टाकली आहेत. त्या आरक्षणांना मंजुरीही मिळालेली आहे. तेथे वेगवेगळे दहा आरक्षणे आहेत. त्यात 12 मीटर रस्ते, 18 मीटर रस्ते, पार्किंग, दोन रिक्रिएशन कॉम्प्लेक्स, तीन एसएससीसी, जलाशय अशी आरक्षणे आहेत. त्या सर्व 61.38 हेक्टर (151.67 एकर) जागेत गोल्फ कोर्स क्लबचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यास मंजुरी मिळाल्यास तेथील दहा आरक्षणांवर हातोडा पडणार आहे. परिणामी, त्या सुविधांपासून नागरिकांना वंचित राहावे लागणार आहे.

### हिरवळीसाठी पाणी लागणार

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. परिणामी, पाण्याची मागणी वाढत असून, शहरातील अनेक हाऊसिंग सोसायट्यांना वर्षभर पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे, महापालिकेकडून मोठ्या मोठ्या गृहप्रकल्पांना बांधकाम परवानगी दिली जात आहे. त्यामुळे पाण्याची गरज भागवताना महापालिकेतवर ताण वाढतच आहे. मुळशी धरण तसेच, ठोकरवाडी धरणातून पाणी आणण्याचे नियोजन सुरू आहे. असे स्थिती असताना गोल्फ कोर्सच्या विस्तीर्ण हिरवळ व झाडांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज भासणार आहे. ते पाणी प्रशासन कोठून आणणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

---

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या सृष्टी खंडागळेची विभागीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगावच्या खेळाडूंनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. शाळेतील १४ वर्षे वयोगटाखालील व २४ किलो वजन गटात इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी सृष्टी खंडागळे हिने प्रथम क्रमांक पटकावून अहिल्यानगर येथे होणाऱ्या विभागीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे.**



या स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या तब्बल १५ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. प्रचंड स्पर्धा आणि खेळाडूंची मोठी संख्या असतानाही शाळेतील स्वयंम माने आणि उत्तम भाटी या दोघांनी आपापल्या वजन गटात अत्यंत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या स्पर्धेत शाळेचे खेळाडू स्वयंम माने, उत्तम भाटी, संजीव भाटी, श्याम माळी, कार्तिक तांबे, कार्तिक गावडे, मानव काळे, युवराज पाटुकळे, प्रतीक प्रजापती, रेहान नदाफ, रिजवान सय्यद, रईस सय्यद, सृष्टी खंडागळे, मदस्वी कांबळे, भाग्यश्री गायकवाड आणि पृथ्वी रोडे यांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त कामगिरी केली. हे सर्व खेळाडू शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. यशवंत माने सर यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत आहेत.'

सृष्टी खंडागळे हिच्या या घवघवीत यशाबद्दल आणि सर्व सहभागी खेळाडूंच्या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार, सचिव अशोक मोरे सर, खजिनदार सुरेखा पवार मॅडम आणि उपाध्यक्ष निलेश पलघोमल सर यांच्यासह संस्थेच्या सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

तसेच, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी श्री. दीपक कान्हेरे सर, क्रीडा पर्यवेक्षक अशोक शिंदे सर, प्रकाश गोवीनवाड सर, शुभम कानडे सर, शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या नाईक मॅडम व नायगम ॲग्नीस मॅडम, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंना पुढील विभागीय स्पर्धेसाठी व भविष्यातील क्रीडा वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# राजमाता जिजाऊ कॉलेजचे तलवारबाजी स्पर्धेत यश

## खेळाडूंचा 19 वर्ष वयोगटात ईपी, फॉईल, सॅबर या क्रीडा प्रकारात सांघिक प्रथम क्रमांक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मनपा शाळा कासारवाडी येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लांडेवाडी भोसरी पुणे येथील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी खेळाडूंनी 19 वर्ष वयोगटात ईपी, फॉईल, सॅबर या क्रीडा प्रकारात सांघिक प्रथम क्रमांक मिळवित घवघवीत यश संपादन केलेले आहे.**



सर्व विजेत्या खेळाडूंची दि.26 ते 27 ऑक्टोबर 2026 या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क जिल्हा अहिल्यानगर येथे होणाऱ्या शालेय विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा.गोपीचंद करंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिं.चि. मनपा. स्थायी समितीचे मा.अध्यक्ष श्री अजितभाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीर मुंगसे सर, पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी , उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा.योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

### जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेतील निकाल

**19 वर्षाखालील मुली**

**फॉईल क्रीडा प्रकार –**
प्रथम क्रमांक 1) कु. दिव्या जगताप, 2) कु. श्रेया वहिले

**सॅबर क्रीडा प्रकार-**
प्रथम क्रमांक- 1) भूमिका जगताप 2) चैत्राली लांडगे 3) प्राची वाघमोडे 4) प्राजक्ता केदारी

**ईपी क्रीडा प्रकार –**
प्रथम क्रमांक 1) कु. आंचल चव्हाण

**19 वर्षाखालील मुले**

सॅबर क्रीडा प्रकार-
प्रथम क्रमांक 1) कु. शुभम जाधव

फॉईल क्रीडा प्रकार –
प्रथम क्रमांक 1) कु. अथर्व लांडगे

ईपी क्रीडा प्रकार
प्रथम क्रमांक 1) कु. गौरव साळी

# “YSN” चॅम्पियन्स ट्रॉफीवर ग्रॅव्हिटी टायटन्सची मोहोर!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**यशवीन सुपरनोव्हा (YSN) चॅम्पियन्स ट्रॉफी सीझन १ स्पर्धेत ग्रॅव्हिटी टायटन्स संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. शनिवारी (दि. २४ ऑक्टोबर) वाकड येथील भूमकर चौकातील कार्तिक कलाटे स्पोर्ट्स अकादमी येथे ही स्पर्धा उत्साहात पार पडली. अंतिम सामन्यात ग्रॅव्हिटी टायटन्सने स्टॉर्म वॉरियर्सवर पाच विकेट्स राखून मात केली.**



या स्पर्धेत ब्रदरहुड सेव्हन, ग्रॅव्हिटी टायटन्स, स्टॉर्म वॉरियर्स, थंडरबोल्ट, रॉयल टायगर्स आणि सुपरनोव्हा युनायटेड या सहा संघांनी सहभाग घेतला.

स्पर्धेतील पहिला उपांत्य सामना रॉयल टायगर्स आणि ग्रॅव्हिटी टायटन्स यांच्यात झाला. या सामन्यात ग्रॅव्हिटी टायटन्सने विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात स्टॉर्म वॉरियर्सने ब्रदरहुड सेव्हनवर मात करत अंतिम सामन्यात धडक मारली.

अंतिम सामन्यात स्टॉर्म वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करत ग्रॅव्हिटी टायटन्ससमोर ४५ धावांचे लक्ष्य ठेवले. हे आव्हान स्वीकारताना ग्रॅव्हिटी टायटन्सने आक्रमक फलंदाजी केली. अवघ्या २.४ षटकांत पाच विकेट्स राखून लक्ष्य पूर्ण करत संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी YSN क्रीडा समितीने विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेमुळे खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

# वायसीएम रुग्णालयात पोलीस हवालदाराला मारहाण

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालत गोंधळ घालणाऱ्या तीन तरुणांनी पोलीस हवालदाराला शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. तसेच गचुंडी धरून जाड लोखंडी कड्याने मारहाण करून संपवून टाकण्याची धमकी दिली. हा प्रकार शनिवारी पहाटे साडेचारच्या सुमारास वायसीएम रुग्णालयात घडला. याप्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.

वैभव सुभाष साळुंखे (वय ३२), कुशल नैना गोयल (वय २८) आणि सोहेल शब्बीर शेख (वय २७, तिघे रा. पिंपळेगुरव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस हवालदार अमोल सुरेश शिंदे गंभीर जखमी झाले असून, त्यांनी याप्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे त्यांचा मित्र कौस्तुभ गुप्ता याला उपचारासाठी वायसीएम रुग्णालयात घेऊन आले होते. आरोपींनी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण करत अरेरावीची भाषा वापरून आरडाओरडा केला. गोंधळ घातला. रुग्णालयात कर्तव्यावर असलेले पोलीस हवालदार अमोल शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आरोपींना शांत राहण्यास सांगितले. मात्र, समज देण्याचा राग मनात धरून आरोपींनी पोलिसांशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर पोलिसांना धक्काबुक्की करत शिवीगाळ केली. आरोपींनी पोलीस हवालदार शिंदे यांच्या गळ्याला पकडून त्यांना बाजूला ढकलले. हातातील जाड लोखंडी कड्याने त्यांच्या पायावर आणि डोळ्याजवळ गंभीर दुखापत केली. संत तुकारामनगर पोलीस तपास करीत आहेत.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046